
आपल्या परिसरातील ताज्या घडामोडींसाठी
Deshdoot Media Group
आजच डाऊनलोड करा, देशदूतचे मोबाईल ॲप !
ॲप डाऊनलोड करण्यासाठी
क्यूआर कोड स्कॅन करा !

शिल्पकार विकासाचा...
# देशदूत

आधारवडाच्या छायेत आता...



स्व. देवकिसनजी (मोठे भाऊ) सारडा यांच्या जीवनावरील विशेष लेख वाचा पान ६, ७ व ८ वर

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | नाशिक | वर्ष ५६ | अंक १०७ | रविवार, दि. २२ डिसेंबर २०२४ | पाने १२ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर

वाचा
देशदूत 'शुभंमगल विशेष'
पुरवणी उद्याच्या (दि.२३) अंकात

## थोडक्यात

### एकाच कुटुंबातील सहा जणांचा अपघाती मृत्यू

**सांगली** | सांगली जिल्ह्यातील बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावर कंटेनर-ट्रक आणि कार यांच्यात झालेल्या भीषण अपघातात एकाच कुटुंबातील सहा जणांचा मृत्यू झाला. ख्रिसमसनिमित्त सुटी असल्याने इप्पाळगोळ हे कुटुंब आपल्या गावाकडे येत होते. त्यावेळी हा अपघात घडला. अपघातातील मृत कुटुंब हे सांगलीच्या जत तालुक्यातील मोरबगी गावचे असून गावावर शोककळा पसरली आहे.

### राहुल गांधी उद्या परभणीत

**नागपूर** | लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी सोमवारी (दि.२३) परभणीच्या दौऱ्यावर येत असून ते पोलीस कोठडीत मृत्यू झालेल्या सोमनाथ सूर्यवंशी या तरुण कार्यकर्त्याच्या कुटुंबाची भेट घेणार आहेत. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी शनिवारी यासंदर्भात माहिती दिली. परभणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकातील संविधान प्रतिकृतीची विटंबना झाल्यानंतर घडलेल्या हिंसाचारप्रकरणी पोलिसांनी अटक केलेल्या सोमनाथ सूर्यवंशी या आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्याचा पोलीस कोठडीत मृत्यू झाला. या घटनेचे पडसाद संपूर्ण राज्यात उमटले. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते शरद पवार यांनी आज परभणीत जाऊन सूर्यवंशी कुटुंबाची भेट घेतली.

## देवेंद्र ३.० चे खातेवाटप जाहीर

# गृहमंत्रालय फडणवीसांकडेच

## शिंदेंना नगरविकास; तिजोरीच्या चाव्या अजित पवारांकडेच








**नागपूर | प्रतिनिधी**

महायुती सरकारच्या मंत्र्यांच्या शपथविधीच्या आठ दिवसांनंतर अखेर खातेवाटपाला मुहूर्त मिळाला असून, हिवाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी सर्व ३३ कॅबिनेट आणि सहा राज्यमंत्र्यांना खातेवाटप जाहीर झाले. ज्या खात्यावरून रुसवेफुगवे सुरू होते ते गृहखाते अपेक्षेप्रमाणे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वत:कडे ठेवले आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना नगरविकास मंत्रालय देण्यात आले आहे, तर अर्थमंत्रालय अजित पवार यांच्याकडेच राहिले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी सर्वात आधी ५ डिसेंबरला शपथ घेतली होती. त्यानंतर १५ डिसेंबरला ३९ आमदारांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. मात्र अजूनपर्यंत त्यांचे खातेवाटप झाले नव्हते. हिवाळी अधिवेशनात विनाखात्याचे मंत्री म्हणून मंत्र्यांनी काम केले. राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाचे सूप वाजल्यानंतर देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंत्रिमंडळाच्या खातेवाटपाविषयी माहिती दिली होती. अखेर आज या शपथ घेतलेल्या मंत्र्यांना अधिकृत मंत्रालय मिळाले. अपेक्षेप्रमाणे गृहमंत्रालय देवेंद्र फडणवीस यांनी स्वत:कडे ठेवले आहे. याशिवाय गृह, ऊर्जा, न्याय व विधी, सामान्य प्रशासन, माहिती व प्रसारण व खातेवाटप न झालेले सर्वच खाते फडणवीस यांनी स्वत:कडे ठेवले आहेत. तर नगरविकास मंत्रालय एकनाथ शिंदे यांच्याकडे आहे. याशिवाय ग्रामविकास मंत्रालय, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम विभाग ही खातीही शिंदेंना मिळाली आहेत. याशिवाय अर्थमंत्रालय आणि राज्य उत्पादन शुल्क ही खाती अजित पवार यांच्याकडेच राहिली आहेत. महसूल खात्याची जबाबदारी चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे देण्यात आली आहे.

### भुसेंना शिक्षण, कोकाटेंकडे कृषी, झिरवाळांना अन्न आणि औषध प्रशासन

नाशिक जिल्ह्यातील तीन मंत्र्यांना कोणती खाती मिळतील याची उत्सुकता संपूर्ण जिल्ह्याला लागली होती. आज ती उत्सुकता पूर्ण झाली. शिवसेनेचे मंत्री दादाजी भुसे यांना शालेय शिक्षण खाते देण्यात आले आहे. माणिकराव कोकाटे यांना कृषी मंत्रालय देण्यात आले आहे. नरहरी झिरवाळ यांना अन्न आणि औषध प्रशासन खाते मिळाले आहे. झिरवाळ यांना आदिवासी विकास मंत्रालय मिळेल, अशी अपेक्षा होती.

मंत्रिमंडळ यादी शेवटच्या पानावर




◉ विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी नागपूर येथील विधानभवनात महाविकास आघाडीच्या आमदारांनी आंदोलन केले.

# राज्य शासनाचे २३ अधिकारी झाले आयएएस

## नीलेश सागर, गीतांजली बाविस्कर, अर्जुन चिखले यांचा समावेश

**नाशिक | प्रतिनिधी**

केंद्र सरकारने महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील २३ अधिकाऱ्यांना आयएएसपदी पदोन्नती दिली होती. केंद्र सरकारचे सचिव संजय चौरसिया यांनी १४ ऑक्टोबर २०२४ रोजी यासंदर्भात आदेश काढले होते. आयएएस (बढतीवर नियुक्ती) कायदा १९५५ नुसार ही बढती देण्यात आली. त्यानंतर आता त्यांच्या नियुक्तीचे आदेश शासनाने काढले आहे.

नाशिक विभागाचे अपर विभागीय आयुक्त नीलेश सागर, नाशिक जातपडताळणी समितीच्या अध्यक्ष गीतांजली बाविस्कर व नंदुरबार जात पडताळणी समितीचे अध्यक्ष अर्जुन चिखले यांना केंद्र शासनाने आयएएस पदावर बढती दिली आहे. राज्य शासनाने आता त्यांची आयएएस म्हणून नियुक्ती केली असून, तसे आदेश काढले आहेत.

नव्या नियुक्तीनुसार, नीलेश सागर यांची मुख्य कार्यकारी अधिकारी, राष्ट्रीय ग्रामीण जीवनन्नोती अभियान, नवी मुंबई येथे तर गीतांजली बाविस्कर यांची समग्र शक्ती अभियानाच्या संचालकपदी नियुक्ती झाली आहे. अर्जुन चिखले यांना विदर्भ विकास बोर्डाचे मेंबर सेक्रेटरी म्हणून नियुक्ती दिली आहे.

नीलेश सागर हे नाशिकला विभागीय आयुक्तालयात अपर आयुक्तपदी कार्यरत आहेत. प्रारंभी धुळे व जळगाव येथे प्रशिक्षण कालावधी पूर्ण केल्यानंतर सन १९९७ ला धुळे येथे उपजिल्हाधिकारी म्हणून त्यांची

पान ८ वर







नाशिक ■ नाशिक ■ जळगाव ■ धुळे ■ नंदुरबार ■ अहमदनगर येथून एकाच वेळी स्वतंत्रपणे प्रकाशित